विषय :- सातारा जिल्हा परिषदेकडील नियमित तसेच कंत्राटी स्वरुपातील अधिकारी/ कर्मचारी/सल्लागार यांच्यासाठी कार्यालयात परिधान करावयाच्या पोशाखाबाबत (ड्रेसकोड)...

सातारा जिल्हा परिषद, सातारा
सामान्य प्रशासन विभाग
जा.क्र.साप्रवि/आस्था-२(३)/११६०/२०२०,
दिनांक -२९डिसेंबर, २०२०

---

वाचा :-१. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.७१/१८ (र.व.का.) दिनांक- ८ डिसेंबर २०२०.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम.

३. ईकडील परिपत्रक क्र. आस्था-२(३)/परिपत्रक/कावि- ७३/२०२० दिनांक २७/०२/२०२०.

परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे जिल्हा परिषद सातारा कडील सर्व खाते प्रमुख व त्यांचे अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.७१/१८ (र.व.का.) दिनांक ८ डिसेंबर २०२० अन्वये महाराष्ट्र शासन अधिनस्त सर्व प्रकारची शासकीय कार्यालये येथून राज्य शासनाचा कार्यभार चालविला जातो. ही कार्यालये जनमानसातील प्रतिनिधी म्हणून पाहण्यात येतात. या कार्यालयांमध्ये मा.खासदार/ मा.आमदार/नगरसेवक इत्यादी लोकप्रतिनिधी, सर्व सामान्य नागरिक, अन्य खाजगी संस्थांचे प्रतिनिधी व उच्च पदस्थ अधिकारी हे कामासाठी भेट देतात व भेट देणा-या संबंधिताशी शासनाचे प्रतिनिधी म्हणून सुसंवाद साधतात. अशा वेळी राज्य शासनाचे प्रतिनिधी म्हणून शासकीय कार्यालयातील सर्व प्रकारचे अधिकारी/कर्मचारी यांची वेशभूषा हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अत्यंत महत्वाचा भाग म्हणून पाहिला जात असल्याने त्यांचे वेशभूषेवरुनच ते कार्यरत असलेल्या आस्थापनेची एक विशिष्ट छाप भेट देणा-या अभ्यांगतांवर पडते. त्यामुळे कार्यालयात काम करीत असलेल्या अधिकारी कर्मचारी यांनी आपली वेशभूषा ही शासकीय कार्यालयास किमान अनुरुप ठरेल अशी असावी याबाबत मार्गदर्शन सुचना देण्यात आल्या आहेत.

त्या अनुषंगाने सातारा जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व कार्यालयामध्ये मा. खासदार/मा.आमदार/ मा. जि.प.सदस्य / सरपंच इत्यादी लोकप्रतिनिधी, सर्व सामान्य नागरिक, अन्य खाजगी संस्थांचे प्रतिनिधी व उच्च पदस्थ अधिकारी हे कामासाठी भेट देत असतात व संबंधिताशी शासनाचे प्रतिनिधी म्हणून जिल्हा परिषदेकडील अधिकारी/कर्मचारी यांचेशी सुसंवाद साधतात.अशा वेळी अधिकारी/कर्मचारी यांचे वेशभूषेवरुनच भेट देणा-या अभ्यांगतांवर छाप पडते. उपरोक्त शासन परिपत्रकानुसार सातारा जिल्हा परिषदेकडील व जिल्हा परिषद अधिनस्त सर्व कार्यालयाकडील अधिकारी/कर्मचारी यांचा कार्यालयातील दैनंदिन पेहराव कशा पध्दतीने असावा याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ९५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देत आहे.

१) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचा दैनंदिन पेहराव हा स्वच्छ , नीटनेटका व शोभनीय असावा.

२) महिला कर्मचा-यांनी कार्यालयात साडी, सलवार/चुडीदार कुर्ता, ट्राऊझर पॅन्ट व त्यावर कुर्ता अथवा शर्ट तसेच आवश्यकता असल्यास दुपट्टा यासह असा शोभनीय पेहराव असावा.

३) पुरुष कर्मचा-यांनी शर्ट, पॅन्ट / ट्राऊझर पॅन्ट असा पेहराव असावा. गडद रंगाचे व चित्रविचित्र नक्षीकाम/चित्र असलेला पेहराव परिधान करु नये.

४) अधिकारी/कर्मचारी यांनी शक्यतो आठवडयातून किमान एकदा (शुक्रवारी) खादी कपडयाचा पेहराव परिधान करावा.

५) सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी ओळखपत्र दर्शनी भागावर धारण करणे आवश्यक आहे.

६) महिला अधिकारी/कर्मचारी यांनी चपला,सॅन्डल, बुट (शुज) चा वापर करावा.

७) पुरुष अधिकारी/कर्मचारी यांनी बुट (शुज), सॅन्डल याचा वापर करावा. कार्यालयामध्ये स्लिपर्सचा वापर करु नये.

८) सर्व शासकीय कार्यालयांच्या कामकाजाची वेळ ४५ मिनिटांनी वाढविण्यात आलेली असल्याने सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी कार्यालयीन वेळ असणार आहे. त्यामुळे वर्ग -४ संवर्गातील कर्मचा-यांसाठी कार्यालयीन वेळ ही सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० अशी राहील व सर्व कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत ९.४५ पुर्वी उपस्थित राहून प्रत्यक्ष कामकाजास ९.४५ वाजता सु रुवात करणे

Scanned by CamScanner

आवश्यक राहील. तसेच सर्व कार्यालयांसाठी भोजनाचीवेळ दु.१.३० ते २.०० अशी निश्चित करण्यात आलेली आहे.

उपरोक्त दिलेल्या सुचनांचे जिल्हा परिषद अधिनस्त सर्व कार्यालयातील नियमित तसेच कंत्राटी स्वरुपातील अधिकारी/कर्मचारी/सल्लागार यांनी काटेकोर अंमलबजावणी करण्याची आहे. सदरबाबत हलगर्जीपणा अगर गैरवर्तन झाल्याची बाब निदर्शनास आल्यास संबंधितांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

विनय गौडा जी सी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद, सातारा
ceozpstr@gmail.com

प्रति,

१) खातेप्रमुख (सर्व) --------------- जिल्हा परिषद सातारा

२) गटविकास अधिकारी (सर्व) पंचायत समिती---------------

प्रत :- माहितीसाठी सविनय सादर :-

१) मा.अध्यक्ष /उपाध्यक्ष , जिल्हा परिषद सातारा

२) मा.सभापती, विषय समिती,जि.प.सातारा

३) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा

प्रत:- सातारा जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता.

Scanned by CamScanner